# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ केस क्र.०४/२०१७-१८/२१८ दिनांक : ०६-०६-२०१७

**<u>आदेश केस क्र.०४/१७-१८</u>**

| | |
|---|---|
| मेसर्स युरेका डायग्नोस्टिक अॅन्ड रिसर्च सेंटर<br>१४१० सी लक्ष्मीपूरी कोल्हापूर | **अर्जदार** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मध्य उपविभाग ,कोल्हापूर | |

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

**<u>संक्षिप्त पार्श्वभूमी</u>**

१) उपरोक्त तक्रारदार यांनी प्रस्तुतचे गा-हाणे अपिल , ऑगस्ट २०१२ ते मे २०१३ या कालावधीतील वीज देयकांद्वारे (जादा वसूल केलेली) फरकाची रक्कम व्याजासह, विलंब भरपाई आणि मनस्तापापोटी झालेल्या नुकसान भरपाईसह वि.प. यांचेकडून मिळणेसाठी या मंचाकडे दि. ०७-०४-२०१७ रोजी दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप

२) तक्रारदार - मे. युरेका डायग्नोस्टिक ॲन्ड रिसर्च सेंटर , कोल्हापूर हे वितरण कंपनीचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २६६५१३११३३१५ असा आहे. त्यांचा वीज पुरवठा मार्च २०१२ पासून L.T. Commercial या दरपत्रकानुसार सुरुवातीस चालू होता. मा. विद्युत नियामक आयोगाने दि. ०१-०८-२०१२ पासून एक "नविन टेरिफ कॅटेगरी" "Public Services in LT & HT Level"निर्माण करुन त्यामध्ये Pathology Laboratories यांचा समावेश केला. तक्रारदार यांचा व्यवसाय हा रोगांचे निदान करण्याचे शास्त्र याच त-हेचा म्हणजे Pathology Laboratory सारखाच आहे. वितरण कंपनीने अशा काही Pathology Laboratories आणि Diagnostic Centers यांना Public Services ची नवी दरसूची लागू केली. तक्रारदार यांनी वारंवार तक्रार केलेनंतर त्यांना सुध्दा जून २०१३ पासून सदरची नविन टेरिफ कॅटेगरी लागू केली आहे. तथापि दिनांक ०१-०८-२०१२ पासून मे २०१३ पर्यन्त जी देयकांमध्ये जादा रक्कम वि.प. यांनी वसूल केली ती परत मिळणेसाठी वेळोवेळी तक्रार अर्ज वि.प. यांना सादर करुन सुध्दा सदरची जास्तीची फरकाची रक्कम परत केलेली नाही. त्यामुळे अखेर तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांच्याकडे दिनांक १६-०१-२०१७ रोजी गा-हाणे दाखल केले. ऑगस्ट २०१२ ते मे २०१३ च्या फरकाची रक्कम याबाबत मुख्य अभियंता(वाणिज्य) मुख्य कार्यालय मुंबई यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कारवाई एक महिन्यात करावी असा निर्णय सदर कक्षाने दिनांक २३-०३-२०१७ रोजी जाहिर केला . त्या निर्णयाने समाधान न झाल्याने प्रस्तुत अपिल तक्रारदार यांनी या मंचासमोर दाखल केले आहे.

## वि.प. यांची भूमिका

३) सन-२०१२ मध्ये लागू केलेल्या नविन Public Services या टेरिफ कॅटेगरीमध्ये डायग्नोस्टीक सेंटरना सदरची वर्गवारी लागू करावी असा उल्लेख नव्हता. त्यामुळे मागील फरकाची रक्कम परत देता आली नव्हती. मुख्य कार्यालयाशी त्याबाबत पत्रव्यवहार करुन निर्णय घेणेत येईल.

४) या प्रकरणाची सुनावणी दि. ०२-०६-२०१७ रोजी या मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार संस्थेचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे आणि वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर, व श्री धनंजय कचरे, सहाय्यक लेखापाल उपस्थित होते. त्या सर्वांची तोंडी निवेदने ऐकण्यात आली आहेत. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

५) तक्रारदार यांचे गा-हाणे , वि.प. यांची भूमिका , उपलब्ध केलेली कागदपत्रे व तोंडी युक्तिवाद विचारात घेता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) मा.विद्युत नियामक आयोगाने जाहिर केलेल्या Pulic Services या नविन टेरिफ कॅटेगरीनुसार ऑगस्ट २०१२ ते मे-२०१३ या कालावधीमध्ये तक्रारदार यांचेकडून अतिरिक्त वसूल केलेली रक्कम (फरकाची रक्कम) परत मागणेस तक्रारदार हे पात्र होते काय?

उत्तरः- होय.

२) ग्राहक गा-हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील नियम ६.६ यानुसार तक्रारदार यांचे प्रस्तुतचे गा-हाणे मुदतीत दाखल केले आहे काय?

उत्तरः- नाही

३) तक्रारदार हे त्यांनी मागणी केलेप्रमाणे विलंबाची भरपाई आणि मनस्तापापोटी नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहेत काय?

उत्तरः- नाही

४) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

६) तक्रारदार ही एक रोगांचे निदान करणा-या वेगवेगळया उपकरणांनी युक्त असलेली संस्था असून त्यांच्या संस्थेत सोनोग्राफी, MRI डिजीटल एक्सरे सिटीस्कॅन वगैरेची सोय असून त्यांचा रोगनिदानासाठी चांगला उपयोग होतो.तक्रारदार यांना उपरोक्त ग्राहक क्रमांकाचा वीज पुरवठा दिनांक ०६-०३-२०१२ पासून मे-२०१३ पर्यन्त कमर्शियल दराप्रमाणे आणि जून २०१३ पासून नविन टेरिफ कॅटेगरी Public services याप्रमाणे चालू आहे. सदरची नविन Public services हि वर्गवारी मा. आयोगाच्या आदेशाप्रमाणे दि. ०१-०८-२०१२ पासून लागू झाली याबाबत वाद नाही. या २०१२ मध्ये लागू केलेल्या वर्गवारीत Pathology Lab यांचा समावेश आहे. त्यात Diagnostic Centre असा स्पष्ट उल्लेख नव्हता, परंतु त्याचा उल्लेख पुढे सन २०१६ मध्ये जारी केलेल्या आदेशात करण्यात आला. Pathology Lab मध्ये रोगाचे निदान करण्यासाठी रक्त तपासणी , लघवी तपासणी वगैरे प्रकारच्या तपासण्या करण्यात येतात. म्हणजे पॅथॉलॉजी प्रयोग शाळेचे आणि डायग्नोस्टीक सेंटरचे प्रयोजन हे प्रामुख्याने रोगनिदान करण्यासाठी असते ही बाब स्पष्ट आहे. त्यासाठी वेगळया प्रकारची उपकरणे जरी वापरण्यात येत असली तरी त्याबाबतचा हेतु हा रोगनिदानाचा आहे. तसे नसते तर मा. आयोगाच्या नंतरच्या आदेशात Public Services या वर्गवारीत डायग्नोस्टीक सेंटरचा उल्लेख झाला नसता. जरी सन-२०१२ च्या मा. आयोगाच्या आदेशात डायग्नोस्टीक सेंटरचा उल्लेख स्पष्टपणे सदरच्या वर्गवारीत नसला तरी त्याच आदेशाच्या आधारे जून २०१३ पासून तक्रारदार यांना वि.प. यांनी Public Services या वर्गवारीत समाविष्ट केले होते. वास्तविक असा समावेश वि.प. यांनी ऑगस्ट २०१२ पासूनच करावयास हवा होता. म्हणजेच दिनांक ०१-०८-२०१२ ते मे-२०१३ पर्यन्त वि.प. यांनी आकारलेली अतिरिक्त रक्कम (म्हणजे वाणिज्य दर आणि Public Services या नविन वर्गवारीचा दर या मधील फरक) परत मिळण्याचा तक्रारदार यांना अधिकार होता.

७) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांनी केलेल्या आदेशाबाबत आणि मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे पत्र क्र. २९०१३ दि. १७-०९-२०१४ चा संदर्भ देऊन तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी बराच युक्तिवाद केला ,तथापि, सदर पत्रामध्ये मुख्य अभियंता यांनी "सदर बाबतीत चौकशी करुन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी." असे अधीक्षक अभिंयता, कोल्हापूर यांना कळविले होते. त्या पत्रामध्ये फरकाची रक्कम तक्रारदार यांना देणेत यावी अशा स्पष्ट सूचना नव्हत्या. तथापि अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने , पुन्हा मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करावी असा आदेश करणेचे कारण नव्हते .सदर पत्रामध्ये , अर्थात तक्रारदार यांचेकडून चुकीचे टेरिफ आकारणेत येत आहे असे मात्र नमूद नव्हते.

८) तक्रारदार यांनी आपल्या वीज पुरवठयाचे टेरिफ Public Services(Laboratory) नुसार लागू करुन ऑगस्ट २०१२ पासून फरक मिळावा अशी मागणी वि.प. यांचेकडे प्रथम दि. २५-१०-२०१२ रोजी, त्यानंतर दि. ११-०३-२०१३ रोजी , नंतर दिनांक ०९-०८-२०१४ रोजी आणि दि. २७-०८-२०१४ रोजी पत्राद्वारे केली होती.

९) दिनांक ०९-०८-२०१४ च्या तक्रारदार यांच्या पत्रास उत्तर म्हणून अतिरिक्त कार्यकारी अभियंता , मध्य उपविभाग, कोल्हापूर यांनी (तक्रारदार यांचा) प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे व आपणास परतावा रक्कम देता येत नाही असे कळविल्याचे, तक्रारदार यांनी दिनांक २७-०८-२०१४ च्या पत्रामध्ये नमूद केले आहे. म्हणजेच ऑगस्ट २०१४ मध्येच तक्रारदार यांची फरकाची रक्कम मिळणेबाबतची मागणी वि.प. यांचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी स्पष्टपणे नामंजूर केली होती ही बाब तक्रारदार मान्य करतात.

१०) वरील विवेचनावरुन एक बाब स्पष्ट होते ती अशी की तक्रारदार यांना गा-हाण्यास कारण (Cause of Action) ऑगस्ट २०१४ मध्ये घडले होते. जेव्हा त्यांची फरकाच्या परताव्याची मागणी नामंजूर करणेत आली . दिनांक १७-०९-२०१४ च्या मुख्य अभियंता यांच्या उपरोक्त पत्रात केवळ चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करावी इतकेच नमूद केले होते. वास्तविक , जून २०१३ मध्ये जेव्हा प्रथमच Public Services टेरिफ वर्गवारी वि.प. यांनी तक्रारदार यांना लागू केली तेव्हा किंवा त्या सुमारास तक्रारदार यांना ऑगस्ट २०१२ ते मे २०१३ या कालावधीतील फरकाची रक्कम परत मागण्यास प्रथम कारवाईचे कारण (Cause of Action) घडले होते.वर नमूद केल्याप्रमाणे ऑगस्ट २०१४ मध्ये अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांची सदरची विनंती नामंजूर केली असे तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२७-०८-२०१४ च्या पत्रात मान्य केले आहे. जरी दि. १७-०९-२०१४ च्या मुख्य अभियंता(वाणिज्य) यांच्या पत्रात चौकशी करुन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी असे नमूद केले असले तरी अशी चौकशी योग्य कालावधीत (Within Reasonable Time) करणेत आली नाही. साधारण ऑक्टोंबर २०१४ पर्यन्त तक्रारदार यांची मागणी मान्य करण्यात आली नाही. म्हणजेच ती अप्रत्यक्षरित्या नाकारणेत आली. वास्तविक फरकाची रक्कम परत मागण्यास प्रथम कारण (Cause of

Action) जुन-जुलै-२०१३ मध्ये घडले. फारतर ओढून ताणून, असे Cause of Action ऑगस्ट २०१४ ते ऑक्टोंबर २०१४ मध्ये घडले असे म्हणता येईल.

११) नोव्हेंबर २०१४ पासून तक्रारदार यांनी फरकाची रक्कम परत मिळणेबद्दल कोणतीही कायदेशीर कारवाई (Legal Action) केली नाही. सन-२०१५ व २०१६ मध्ये अशी कारवाई केल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा मंचासमोर दाखल केलेला नाही. दिनांक १६-०१-२०१७ रोजी प्रथमच अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रारदार यांनी तक्रार अर्ज दाखल केला.त्यामुळे वादविषयास प्रथम कारवाईचे कारण (Cause of Action) घडल्या पासून दोन वर्षात गा-हाणे दाखल करणे,ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ६.६ च्या तरतूदीप्रमाणे आवश्यक होते. या कारणा वरुन, तक्रारदार यांची फरकाची रक्कम मिळणेची सदरची मागणी मुदतबाहय/कालबाहय झालेली आहे. ती मंजूर करता येत नाही. सदरची मुख्य मागणी नामंजूर होणेस पात्र असल्या कारणाने तक्रारदार यांनी मागितलेल्या इतर अनुषंगिक बाबी(नुकसान भरपाई वगैरे) मंजूर करता येत नाहीत.

१२) वरील सर्व कारणांस्तव तक्रारदार यांचे प्रस्तुतचे अपिल नामंजूर होणेस पात्र आहे. कारण त्यांची मागणी मुदतबाहय (Barred by Limitation) झालेली आहे. तक्रारदार यांना कारवाई करण्याचे कारण प्रथम जुन-जुलै-२०१३ मध्येच घडले होते. The Limitation Act १९६३ च्या कलम ९ प्रमाणे एकदा कारवाई करण्यासाठीचा मुदतीचा कालावधी सुरु झाला की तो थांबत नाही. सकृतदर्शनी The Limitation Act १९६३ च्या परिशिष्टातील आर्टीकल ११३ नुसार सुध्दा तक्रारदार यांची मागणी मुदतबाहय झालेली आहे. दि. १७-०९-२०१४ चे मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे उपरोक्त पत्र हे The Limitation Act च्या कलम १८ प्रमाणे कोणत्याही प्रकारे Acknowledgement होऊ शकत नाही.

सबब, खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार यांची ऑगस्ट-२०१२ ते मे-२०१३ या काळाची फरक मिळणेची गा-हाण्यातील मागणी मुदतबाहय झाल्यामुळे नामंजूर करणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

टिपः- काही अपरिहार्य कारणास्तव सुनावणी दरम्यान सदस्य सचिव यांना उपस्थित राहता आले नाही, तरीही वरील निर्णयाशी ते सहमत आहेत.